N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम  **P.S.(ठाणे):** मानोरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0183  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/04/2023 02:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 10/04/2023

**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/04/2023

**Time From (वेळेपासून):** 17:19 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/04/2023  **Time (वेळ):** 01:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/04/2023 01:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यलय मानोरा ,मानोरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.ज्योतीलाल रामजी राठोड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामकशण नगर बी,उमरेड रोड दिघोरी ,नागपुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माहुली ,मानोरा,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9637315874

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोहन शेषराव तिडके | | | 1. महसुल कॉलनी कारंजा,कारंजा , मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिलीप तुळशीराम मनवर | | | 1. हिवरा बु,मानोरा ,मानोरा , वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 3 | जगदिश पथ्वीराज चव्हाण | | | 1. शिवनी ,मानोरा ,मानोरा , वाशिम,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पोस्टे मानोरा दिनांक:-11.04.2023
माझे नांव - श्री.ज्योतीलाल रामजी राठोड, वय-29 वर्षे, व्यवसाय-नोकरी प्रिआंती इंग्लीष स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज, तरोडा ता.कामठी जि.नागपुर रा.माहुली ता.मानोरा जि.वाशिम, ह.मु.श्री अनिल कोपावार प्लॉट नं.54, रामकृशण नगर बी, उमरेड रोड दिघोरी ता.जि.नागपुर, मो.नं.9637315874 मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो व प्रिआंती इंग्लीष स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज, तरोडा ता.कामठी जि.नागपुर येथे सन 2018 पासुन पर्यवेक्षक या पदावर कार्यरत आहे.दिनांक 10.04.2023 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय वाशिम येथे गेलो असता तेथे मला पोलीस निरीक्षक श्री महेश भोसले लाप्रवि वाशिम हे भेटले यांचेकडे मी माझी लाच मागणी बाबत तक्रार सांगितली असता त्यांनी माझी तक्रार ऐकुन घेउन दोन सरकारी पंच बोलवले व सदरची माझी तक्रार मला स्वतःचे हस्ताक्षरात दोन सरकारी पंचा समोर लिहीण्यास सांगीतली असता ती मी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर दोन्ही पंच,तक्रारदार म्हणून माझी व पोनि श्री महेश भोसले यांनी सहया केल्या ती तक्रार पुढील प्रमाणे

"माझे मुळ गाव माहुली ता.मानोरा जि.वाषिम असुन मी नोकरी निमित्ताने नागपुर येथे राहतो. माझे नावे मुळ गावी माहुली येथे गट नं.1 मध्ये वडीलोपार्जित 0.86 हे.आर शेती असुन सदर शेती माहुली गावठाणा पासुन 200 मी चे आत अकोला ते दिग्रस 161(ए) राष्ट्रीय महामार्ग लगत आहे.

सदर शेती अकृशक करावयाची असल्याने अकृशक कराचा भरणा करणे असल्याने परवानगी मिळविण्याकरीता दिनांक 09/11/2022 रोजी तहसिल कार्यालय मानोरा येथे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दिला होता. त्यानंतर मला तहसिल कार्यालय मानोरा येथील तिडके बाबु यांनी दि.27/02/2023 रोजी 17,850/- रुपयाच्या चार वेगवेगळ्या चालान काढुन दिल्या. सदर चारही चालान मी दिनांक 28/02/2023 रोजी मानोरा एसबीआय शाखा येथे भरली आहे. त्याबाबत मी दिनांक 01/03/2023 रोजी तहसिल कार्यालय मानोरा येथे श्री तिडके बाबु यांना प्रत्यक्ष भेटुन कळविले तेंव्हा त्यांनी मला सांगीतले की, मी तुमचे अकृशक चे काम करुन देतो. त्याकरीता तुम्हाला मला 40,000 /- रुपये दयावे लागतील. मला माझे काम वेळेवर करणे गरजेचे होते त्यामुळे मी त्यावेळी त्यांना नाईलाजाने पैसे देण्याचे कबुल केले होते. मी पैसे देण्याचे कबुल करुनही त्यांनी माझे काम केले नसल्यामुळे मी दिनांक 10/03/2023 रोजी श्री तिडके बाबु यांना मोबाईल फोनव्दारे संपर्क केला असता त्यांनी माझ्या कामाबाबत वेगवेगळी कारणे देउन माझे काम केलेले नाही. मी बाहेर गावी नोकरीला असल्यामुळे तसेच मला नेहमी नेहमी येणे जाणे परवडणारे नसल्यामुळे श्री.तिडके बाबु तहसिल कार्यालय मानोरा यांना पैसे देण्याचे कबुल केले आहे. आज रोजी माझी खात्री झाली आहे की, श्री तिडके बाबु हे माझे काम पैसे घेतल्याशिवाय करणार नाहीत. सदर शेती अकृशक करण्याकरीता आवश्यक असलेली फि मी चालानव्दारे यापुर्वीच बँकेत भरलेली आहे. त्याव्यतिरीक्त इतर कुठलीही फि किंवा पैसे लागत नाही हे मला माहित आहे.
माझी श्री तिडके बाबु तहसिल कार्यालय मानोरा यांच्याशी कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसनवारीचा व्यवहार नसुन आपशी दुष्मनी नाही. श्री.तिडके बाबु तहसिल कार्यालय मानोरा यांच्यावर कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे.कारवाही होण्यास विनंती आहे."
सदर तक्रार लिहुन दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महेश भोसले यांनी मला पडताळणी कार्यवाही बाबत, तसेच मेमरी कार्ड व व्हाईस रेकॉर्डर चे कार्यप्रणाली बाबत समजावून सांगितले. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 10.04.2023 रोजी मला, पंच क्र.1 श्री मात्रे यांचेसह लोकसेवक मोहन तिडके तहसिल कार्यालया मानोरा यांचे भेटीकरीता व्हाईस रेकॉर्डर लावुन पाठवून पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये आमच्या भेटी दरम्यानचे संभाषण रेकार्ड झाले आहे.
भेटी दरम्यान लोकसेवक तिडके बाबु यांना भेटल्यावर मी गैरअर्जदार तिडके यांना म्हटले हो का मला तुम्ही असं एक सांगुन दया मला तशी तडजोड करावी लागेल म्हणजे भावाला वगैरे त्यावर गै.अ.तिडके यांनी मला म्हटले की, तुम्ही सांगा तुमचा आकडा काय? त्यावर मी म्हटले तुम्ही सांगा नं त्यावर गै.अ.तिडके म्हणाले तुम्ही सांगा...येच्यावर

लिहुन दया तुम्ही सांगा आता तुम्ही सर आहे आता तुम्हालं काय आता. हे लेआउट आहे तुम्हाल माहिती आहे. मग मी गै.अ.तिडके यांना म्हटले हव नाही तुमचा आकडा दिला असता त. त्यावर गै.अ.तिडके म्हणाले तुम्ही सांगा. वरुन दिलीप मनवर म्हणले आमच्यावर लय आहे. वरुन गै.अ.तिडके म्हणाले आमच्यावर लय आहेत... हे पहा हे दुसर प्रकरण झालं हे आत्ताच गेलान काढायल तो. त्यावर मी गै.अ.तिडके यांना म्हटले तुम्ही लिहुन दया तुमच्या हिशोबानी... वरुन गै.अ.तिडके यांनी एका कागदावर 30 हजार रुपयांचा आकडा लिहला असता मी गै.तिडके यांना म्हटले की 30 हजार का. तेव्हा गै.अ.तिडके मला म्हटले बोलु नका... त्यावर मी गै.अ.तिडके यांना म्हटले किती तिस हजार करु. यावर गै.अ.तिडके मला चिडुन म्हटले की अरे तुम्ही बोलता काहुन हो. त्यावर मी गै.अ.तिडके यांना म्हटले बाही करुन दयाल न सर्व असे म्हटले असता गै.अ.मला म्हटले मी सनद देईल. त्यावर मी गै.अ.तिडके यांना म्हटलो अच्छा पैसे कधी आता आणुन देउ की उदया देउ पहाटेच. त्यावर ते मला म्हटले की तुम्ही त्या गोष्टी करु नका यार ते रेकार्ड होतात. मी गै.अ.तिडके यांना म्हटले बरं तुम्ही कीती वाजे पर्यंत आहे ईथं...साडे पाच पर्यंत माझं असं म्हणनं आहे की माझं आजचं करुन टाकतो घरी जातो घरुन येतो गै.अ.तिडके मला म्हटले की यानं तुम्ही त्यावर मी त्यांना म्हटलो अं...ठिक हे येवु मंग....की काही देउ आता अजुन विश्वास नसेल तर ... खर्चपाण्यासाठी गै.अ.तिडके मला म्हटले नाही तसं नाही ते पुर्णच आपल्यालं लागतील... ईथं काहीच नका करु तुम्ही दहा मिनीटात या. मी गै.अ. तिडके यांना म्हटले ठिक हे येवु मंग बँकेतुन. मी करतो तडजोड तिस हजाराची त्यावर गै.अ.तिडके मला म्हटले पटकणं या. बोलु नका फक्त इथं त्यावर मी गै.अ.तिडके यांना म्हटले ठिक आहे असे पडताळणी दरम्यान बोलुन लोकसेवक तिडके बाबु यांनी माझे नावे असलेली शेती अकृशक करुन देण्यासाठी मला 30,000/-लाचेची मागणी करुन लाच रक्कम आजच देण्याचे सांगीतल्याने आजच सापळा कारवाई आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरले.

दिनांक 10/04/2023 रोजी सर्वानुमते ठरल्याप्रमाणे सापळा कारवाई करण्याकरीता मला व पंच क्र.01 श्री मात्रे यांना पोनि श्री महेश भोसले लाप्रवि वाशिम यांनी गै अ.तिडके यांची भेट घेउन लाच रक्कम देण्या करीता रवाना केले. सदर कारवाई दरम्यान गै.अ.तिडके बाबु यांची व माझी तहसिल कार्यालयाचे कार्यालयाबाहेरच भेट झाली.मी गै.अ. तिडके बाबु यांना म्हटले आता म्हणलं तुम्हीच भेटले म्हणलं तुम्हालाच भेटुन घेतो सरांनाच योगायोग बाहेरही आले मी काय म्हणतो थोडा प्रायोरीटीवर घेउन मी उदयाच वाशिमला चालला जातो असे म्हटले. तिडके बाबु यांनी मला आहो मी तुम्हाला मी आत्ताच देतो पाच मिनीटात तुम्ही जाउ नका असे म्हटले असता, मी त्यांना म्हटल आता आनले त ईकडचं घेउन घ्यानं आता तिकडे माझे काका बसलेले आहेत ते मला रागावतील म्हणुन म्हटले ते भाउसाहेब आमचे काका आहेत असे म्हटले. त्यावर तिडके बाबु यांनी मला दोन मिनीटं थांबा असे म्हटले. मी तिडके बाबु यांना इथेच घ्यानं मागे असे म्हटले असता त्यांनी मला थांबा पाच मिनीटं...तुम्ही तिथं थांबानं झाडाजवळ जाउन असे म्हणुन कार्यालयात गेले व कार्यालयातुन तहसील कार्यालयातील कॉम्प्युटर ऑपरेटर जगदीश चव्हाण यांना माझे जवळ पाठविले. व दुरुन मला हाताच्या इशा-याने चव्हाण यांचेकडे पैसे देण्याचे सांगीतल्याने चव्हाण माझे जवळ आले. मी त्याचे जवळ लाचेची रक्कम 30,000/-रु दिली व जगदीश चव्हाण यांनी माझे जवळुन 30,000/-रु लाचेची रक्कम डाव्या हाताने स्विकारली.अंगात घातलेल्या फुलपॅन्टच्या डावे बाजुचे समोरील खिश्यात ठेवली. तेवढयात तिथे मनवर देखील आले मी त्यांना नमस्कार मनवर साहेब असे म्हणुन मी त्यांना म्हटलो की देलेनं आपल्या मानसाजवळ असे म्हटले असता त्यांनी मला देले का बर जाउ दयानं असे म्हटले. मनवर यांनी मला झालं नं काम असे म्हटले. सापळा कार्यवाही दरम्यान गै.अ. तिडके यांनी स्वतः लाचेची रक्कम न स्विकारता त्यांच्या वतीने त्यांचे कार्यालयात काम करनारे कॉम्प्युटर ऑपरेटर जगदीश चव्हाण यांना लाचेची रक्कम स्विकारण्यास सांगीतले त्याप्रमाणे जगदीश चव्हाण यांनी माझे जवळुन लाचेची रक्कम स्विकारली. सदर लाच मागणी मध्ये दिलीप मनवर या खाजगी इसमाने श्री तिडके यांना वारंवार लाच रक्कम घेणे बाबत प्रोत्साहन दिले.

आज दि.10.04.2023 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान मोहन शेषराव तिडके वय 50 वर्षे पद वरीष्ठ लिपिक,तहसिल कार्यालय मानोरा,रा.महसुल कॉलनी कारंजा जि.वाशिम यांनी माझी शेती आकृर्षक करण्याकरीता तडजोडी अंती 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन पडताळणी व सापळाकारवाई दरम्यान दिलीप तुळशीराम मनवर वय 56 वर्षे,व्यवसाय मजुरी रा.हिवरा बु.ता.मानोरा जि.वाशिम (खाजगी इसम) यांनी त्यांना लाच रक्कम घेण्यास प्रोत्साहीत केले. तसेच जगदिश पृथ्वीराज चव्हाण, वय-30 वर्ष, व्यवसाय संगणक ऑपरेटर (कंत्राटी), तहसिल कार्यालय मानोरा जि.वाशिम रा.शिवनी ता.मानोरा जि.वाशिम यांनी सापळा कारवाई दरम्यान आज दि. 10.04.2023 रोजी 17.30 वा दरम्यान माझेकडुन 30,000/-रूपये लाचेची रक्कम मोहन तिडके यांचे वतीने स्विकारली. म्हणुन माझी वरील तिन्ही आरोपी विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पो.हवा.नितिन टवलारकर यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहीली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष सही

(महेष भोसले) ( श्री.ज्योतीलाल रामजी राठोड )
पोलीस निरीक्षक, रा.माहुली ता.मानोरा जि.वाशिम
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
NAMDEV Mahadev BAWANE
**Rank (पद):** PC (Police Constable) **No.(क्र.):** POBN75739
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**

ठाणे अंमलदार

**Name (नाव):** MAHESH NEMCHANI
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** PBPAM82471